महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १२ वा दिनांक : २६/०९/२०२४ वार : गुरूवार

# मराठा नेते मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंनीही घेतली माघार



**जालना** : मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण केले होते. मात्र सलग आठ दिवस उपोषण केल्याने त्यांची प्रकृती खालावली होती. यामुळे त्यांचे समर्थक त्यांना उपोषण सोडावे अशी मागणी करत होते. अखेर आज नवव्या दिवशी मनोज जरांगे यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले आहे. अंतरवाली सराटी येथे जमलेल्या महिला आणि बांधवांच्या हस्ते पाणी पिऊन मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले. आता मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार केले जाणार आहेत.

एकीकडे मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले तर दुसरीकडे वडीगोद्री येथे ओबीसी समाजासाठी उपोषणाला बसलेले लक्ष्मण हाके यांनी देखील उपोषण स्थगित केले आहे. जालना जिल्ह्यातील या दोन्ही गावांमध्ये सुरू असलेल्या या उपोषणांमुळे राज्यभर वातावरण तापले होते. मनोज जरांगे यांनी नऊ दिवस उपोषण केले मात्र सरकारकडून कोणतेही पाऊल उचलले गेले नाही तसेच सरकारचे कोणतेही शिष्टमंडळ त्यांना भेटण्यासाठी आले नाही, म्हणून मराठा समाज आक्रमक देखील झाला होता. मंगळवारी मराठा समाजाने धुळे-सोलापूर महामार्ग अडवला होता.

एकीकडे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांचे उपोषण तर दुसरीकडे त्यांना विरोध करण्यासाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी देखील उपोषण सुरू केले होते. या काळात मराठा-ओबीसी समाज एकमेकांच्या विरोधात गेल्याने तणाव देखील निर्माण झाला होता.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित केल्याचे श्रेय लक्ष्मण हाके यांनी स्वतःकडे घेतले आहे. लक्ष्मण हाके म्हणाले, मनोज जरांगे यांचा उधळलेला वारू, बेकायदा मागण्या करणे, ओबीसीमधूनच आरक्षण मागणे, ओबीसी समाजाला टार्गेट करणे, हे सगळे मनसुबे आम्ही आमच्या उपोषणाने उधळून लावले असल्याची प्रतिक्रिया हाके यांनी माध्यमांना बोलताना दिली आहे.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यावर बोलताना म्हणाले, मराठा समाजाला जर आरक्षण दिले नाही तर येत्या निवडणुकीमध्ये पाडापाडी झाली तर मला जबाबदार धरू नका, असा इशारा त्यांनी दिला. तसेच मराठा तरूणांनी कोणत्याही राजकीय नेत्याच्या आणि त्यांच्या मुलांच्या पाठीशी न फिरता समाजासाठी काम करावे, असा सल्ला जरांगे यांनी दिला आहे.

पुढे बोलताना जरांगे म्हणाले, श्रीमंत मराठे आपली पोरं कधीच मोठी होऊ देणार नाहीत. शेतकरी मराठा रात्रंदिवस चिखलात, उन्हात काम करून आपले लेकरू कधी नोकरीला लागेल याची वाट बघतो. मजूर मराठा देखील त्याची वाट बघतो. त्यामुळे मराठा आरक्षण मिळावे, अशी इच्छा प्रत्येक मराठा बांधवाची आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ सप्टेंबर २०२४


## लाडकी बहीण योजनेसाठी आले चक्क ६ भावांचे अर्ज

### सरकारची आधारकार्ड निलंबित करण्याची कडक कारवाई, खुलासाही मागवला



**अकोला :** राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला राज्यभरील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत सुमारे दोन कोटीनपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेची नोंदणी अद्यापही सुरूच आहे. अकोल्यात लाडकी बहीण योजनेसाठी ६ भावांनी अर्ज केल्याचा प्रकार समोर आला आहे. या ६ जणांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी खोटी कागदपत्रे जमा केल्याचे तपासात आढळले आहे. या सहा जणांवर महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने कारवाई करण्यात आली आहे.

अकोल्यातील ६ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी नारी शक्ती दूत ॲपवर खोटी माहिती देत अर्ज भरला. अर्ज छाननीच्या वेळी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली. आता त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

महिला आणि बालकल्याण विभागाकडून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या या सहा जणांचे आधार कार्ड निलंबित करण्यात आले आहे. या सहा पुरुषांना आधारकार्ड द्वारे कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच त्यांच्याकडून या प्रकाराबद्दल खुलासा मागवण्यात आला आहे, अशी माहिती अकोला जिल्हा माहिती आणि बालकल्याण अधिकारी गिरीश पुसदकर यांनी दिली आहे.

राज्य सरकारच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी रायगड येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सप्टेंबरपर्यंत अर्ज केलेल्या पात्र लाभार्थी महिलांना तिसऱ्या हप्त्याचे वितरण केले जाणार आहे. या कार्यक्रमातून सुमोर २ कोटी महिलांना लाभ दिला जाणार आहे. मागील दोन महिन्यांत काही अर्जात त्रुटी राहिल्यामुळे अनेक महिला लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या होत्या. त्यामुळे या तिसऱ्या हप्त्यात वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना थेट खात्यात पैसे जमा केले जातील, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अजूनही सुरूच आहे. ज्या महिलांचा अर्ज भरायचा बाकी आहे किंवा ज्या महिलांच्या अर्जात त्रुटी निघाल्या अशा महिलांना येत्या ३० सप्टेंबरपर्यंत या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे.

## आलिया भट्टने ऐश्वर्या राय-बच्चनला फोटोमधून केलं क्रॉप?



**पॅरिस :** नुकतंच एका नामांकित कॉस्मेटिक कंपनीचा 'पॅरिस फॅशन वीक' पार पडला. या 'पॅरिस फॅशन वीक'साठी जगभरातील सौंदर्यवतींनी हजेरी लावली होती. यावेळी बॉलीवूडची अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन आणि आलिया भट्ट रॅम्प वॉक करताना दिसल्या. एकाबाजूला ऐश्वर्याने ऑफ शोल्डर रेड गाउनमध्ये जबरदस्त रॅम्प वॉक केला. तर दुसऱ्या बाजूला आलियाने सिल्वर आणि ब्लॅक कॉम्बिनेशनवाला सुंदर अशा ड्रेस मध्ये आपला जलवा दाखवला. सध्या 'पॅरिस फॅशन वीक'मधील ऐश्वर्या व आलियाच्या रॅम्प वॉकचे फोटो आणि व्हिडीओ तुफान व्हायरल झाले आहेत. अभिनेत्री आलिया भट्टने 'पॅरिस फॅशन वीक'मधील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. "एक्साइटमेंट, एम्ब्रेस आणि इन्स्पीरेशनची रात्र... कारण आम्ही #WorthIt आहोत," असं कॅप्शन लिहित आलियाने फोटो शेअर केले आहेत. यामध्ये आलियाचे काही एकटीचे फोटो आहेत तर काही ग्रुपचे फोटो आहेत. या ग्रुप फोटोमध्ये जगभरातील सौंदर्यवती आहेत. ज्यामध्ये ऐश्वर्या राय-बच्चन देखील आहे. पण आलियाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ऐश्वर्या दिसत नाहीये. त्यामुळे आलियावर नेटकऱ्यांनी टीका केली आहे.

आलियाने दुसऱ्या फोटोमध्ये ऐश्वर्या राय-बच्चनला क्रॉप केल्याचं म्हटलं जात आहे. "तू ऐश्वर्याला दुर्लक्ष का केलंस?", "यालाच म्हणतात मत्सर", अशा प्रकारच्या प्रतिक्रिया ऐश्वर्याच्या चाहत्यांनी आलियाच्या पोस्टवर दिल्या आहेत. पण ज्या फोटोमुळे ऐश्वर्याचे चाहते आलियावर टीका करत आहेत, तो फोटो झूम केलेला आहे. तिच्या पोस्टमध्ये आणखी एक लाँग शॉट फोटो देखील आहे, त्यात ऐश्वर्या राय-बच्चन दिसत आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## आम्हाला बंदूक दाखवली तर आम्ही संविधान दाखवू

### सुप्रिया सुळे यांची देवेंद्र फडणवीसांवर टीका, वादग्रस्त बॅनरवरून साधला निशाणा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी हातात पिस्तूल असणाऱ्या बॅनरवरून राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खरपूस समाचार घेतला. देवेंद्र फडणवीस यांचे हे बॅनर फारच धक्कादायक आहे. हे बॅनर पाहणाऱ्या मुलांवर काय संस्कार होतील? असा कटू सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

बदलापूर लैंगिक शोषणातील आरोपी अक्षय शिंदेचे पोलिसांनी एन्काउंटर केले. या घटनेमुळे राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांनी या प्रकरणी न्याय झाल्याची भावना व्यक्त केली आहे. तर विरोधी पक्षांनी हे एन्काउंटर संशयास्पद असल्याचा आरोप केला आहे. अक्षयच्या कुटुंबीयांनी यावर संशय व्यक्त केला आहे. त्यातच भाजपने देवेंद्र फडणवीस यांचे एक वादग्रस्त बॅनर वांद्रे कलानगर परिसरात लावले आहे.

या बॅनरवर फडणवीस यांचे २ फोटो आहेत. त्यातील एका फोटोत देवेंद्र यांच्या हातात पिस्तुल आहे, तर दुसऱ्या फोटोत त्यांच्या हातात रायफल आहे. या बॅनवर 'बदला पुरा' असे दोन शब्द लिहिण्यात आलेत. त्यामुळे या बॅनरद्वारे एकप्रकारे अक्षय शिंदेचे एन्काउंटर करुन पोलिसांनी बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातील पीडित कुटुंबीयांना न्याय मिळवून दिल्याचा संदेश दिला आहे.

हे बॅनर माझ्यासाठी फार धक्कादायक

खासदार सुप्रिया सुळे यांनी या बॅनरवरुन देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. त्या म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस राज्याचे गृहमंत्री आहेत. त्यामुळे त्यांच्या हातात बंदूक असलेले पोस्टर लागणे हे माझ्यासाठी खूप धक्कादायक आहे. जी मुले हे बॅनर पाहतील त्यांच्यावर काय संस्कार होतील? आता या राज्याचाच गृहमंत्री बंदूक घेऊन फिरत आहे.

मिर्झापूरच्या गोष्टी टीव्ही सीरिजमध्येच चालतात. पण बॉस हे वास्तव आहे. हा शाहू, फुले, आंबेडकरांचा देश आहे. देवेंद्र फडणवीस यांनी तेथून आम्हाला बंदुका दाखवल्या, तकर आम्ही त्यांना येथून संविधान दाखवू, असा इशाराही सुप्रिया सुळे यांनी यावेळी भाजपला दिला.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपला धक्का

### दिनेश परदेशी यांचा ठाकरे गटात प्रवेश; उद्धव यांनी शहांचा 'बाजारबुणगे' म्हणून केला उल्लेख



**छत्रपती संभाजीनगर :** येथील भाजपचे बडे पदाधिकारी डॉक्टर दिनेश परदेशी यांनी बुधवारी भाजपला सोडचिठ्ठी देत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यांनी पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हाती शिवबंधन बांधले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. त्यांनी त्यांचा उल्लेख 'बाजारबुणगे' म्हणून केला. या बाजारबुणग्यांची हा महाराष्ट्र आपल्या टाचेखाली घेण्याची इच्छा आहे. पण त्यांना हा महाराष्ट्र विरांचा आहे हे माहिती नाही, असे ते म्हणाले.

मागील अनेक दिवसांपासून डॉक्टर दिनेश परदेशी यांच्या ठाकरे गटातील संभाव्य प्रवेशाविषयी चर्चा सुरू होती. या चर्चेला आज पूर्णविराम मिळाला. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात आपल्या समर्थकांसह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे वैजापूरमध्ये ठाकरे गटाचा उमेदवार कोण? या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. दिनेश परदेशी यांची वैजापूर विधानसभा मतदारसंघातून विधानसभा लढवण्याची इच्छा आहे. आता त्यांची ही इच्छा ठाकरे गटातून पूर्ण होण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाजप व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर सडकून टीका केली. मी गेल्या आठवड्यात वैजापूरला येऊन गेलो. त्याचवेळी तुमची आमच्या पक्षात प्रवेश करण्याची इच्छा होती. पण त्यावेळी तो प्रवेश झाला नाही. पण आता तुमचा उलटा प्रवास सुरू झाला आहे. तुम्ही भाजपतून इकडे आलात. त्यामुळे माझा भाजपच्या कट्टर कार्यकर्त्यांना प्रश्न आहे की, भाजपमध्ये ज्या पद्धतीने भेसळीचा कार्यक्रम सुरू झाला आहे, तो तुम्हाला मान्य आहे का? सध्या हिंदुत्त्वाच्या नावाखाली जे थोतांड माजवण्यात येत आहे, ते हिंदुत्त्व माझे नाही, असे ते म्हणाले.

काल महाराष्ट्राच्या बाहेरचे बाजारबुणगे नागपूरमध्ये येऊन गेले. त्यांनी आम्हाला संपवण्याची भाषा केली. त्यांचे भाषण मी ऐकले नाही. पण या बाजारबुणग्यांना हा महाराष्ट्र आपल्या टाचेखाली घ्यायचा आहे. हा महाराष्ट्र विरांचा आहे हे त्यांना माहिती नाही. त्यांनी महाराष्ट्रात येऊन दाखवावे. त्यानंतर महाराष्ट्र कुणाला संपवतो हे आम्ही दाखवतो. माझ्याकडे बोलण्यासारखे खूप काही आहे. पण आताच फार काही बोलणार नाही. प्रचार सुरू झाला की सर्वकाही पुढे येईल, असेही उद्धव ठाकरे यावेळी अमित शहा यांना आव्हान देण्याच्या सुरात म्हणाले.

डॉक्टर दिनेश परदेशी यांचे वैजापूर विधानसभा मतदारसंघावर मोठा प्रभाव आहे. त्यांनी यापूर्वी दोनवेळा काँग्रेसकडून विधानसभा निवडणूक लढवली. पण अगदी थोड्या मतांनी त्यांचा पराभव झाला. काँग्रेसमधून त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता ते ठाकरे गटात आलेत. त्यांना ठाकरे गटाची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. त्यांना ठाकरेंची उमेदवारी मिळाली तर ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे विद्यमान आमदार रमेश बोरनारे यांना आव्हान देतील अशी शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ सप्टेंबर २०२४


## एकनाथ शिंदे मूर्ख, नालायक मुख्यमंत्री

### भाजप नेते पद्माकर वळवी यांची जीभ घसरली



**नंदुरबार :** राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना धनगर आरक्षणावरुन आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. नंदुरबार येथे धनगर आरक्षणासाठी आदिवासी बांधवांनी बुधवारी आंदोलन केले. या आंदोलनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना भाजप नेते पद्माकर वळवी यांची जीभ घसरली. त्यांनी एकनाथ शिंदेंचा एकेरी भाषेत उल्लेख केला. तसेच शिंदे हे बेरड, मूर्ख आणि नालायक मुख्यमंत्री असल्याचे ते म्हणाले पद्माकर वळवी पुढे बोलताना म्हणाले की, आदिवासी आमदार, खासदारांनी राजीनामा देण्याची गरज नाही. आम्ही राजीनामा देत आहोत अशी सरकारला फक्त धमकी द्या. तसेच भाजप आणि शिवसेना पक्षाची उमेदवारी घेऊ नका, असे आवाहन त्यांनी केले.

सरकार निवडणुकीच्या उद्देशाने धनगर समाजाला फसवण्याचे काम करत आहे, असा आरोपही पद्माकर वळवी यांनी यावेळी केला.

जे सरकार किंवा पक्ष आदिवासींच्या विरोधात निर्णय घेईल त्याला जमिनीत गाडल्याशिवाय शांत बसू नका. आदिवासी क्षेत्रातून भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेला हद्दपार करा, असे आवाहन वळवी यांनी केले.

पद्माकर वळवी १९९९ ते २०१४ या कालावधीत कॉँग्रेससकडून तळोदा आणि शहादा मंतदारसंघातून निवडून आले आहेत. २००९ ते २०१४ या काळात त्यांना राज्यमंत्रिमंडळात स्थान मिळाले होते. त्यांनी नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे क्रीडामंत्री म्हणून काम पहिले आहे. पद्माकर दळवी यांनी २०२४ लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामावर प्रभावित होऊन भाजपमध्ये आल्याचे त्यांनी त्यावेळी सांगितले होते.

## जायकवाडी धरण ओव्हरफ्लो



**पैठण :** मराठवाड्याची जीवनवाहिनी असणारे जायकवाडी धरण १०० टक्के भरले असून जलाशयामध्ये सध्या ४ हजार १६९ क्युसेक्स पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे नाथसागर प्रकल्पाचे २७ पैकी १२ दरवाजे प्रत्येकी अर्ध्या फुटाने उघडण्यात आले आहे. धरणाचे दरवाजे दुसऱ्यांदा उघडण्यात आले असून गोदावरी नदीपात्रामध्ये ६ हजार ७८८ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी दिली.

## मस्क अन् पंतप्रधान मेलोनीची गुटूरगू?



**वॉशिंग्टन :** वृत्तसंस्थाअमेरिकेचे उद्योगपती इलॉन मस्क आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचा एक फोटो व्हायरल झाला आहे. यामध्ये दोघे एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून हरवून गेल्याचे दिसून येत आहे. या फोटोवरुन सोशल मीडियावर त्यांच्या डेटिंगचीच चर्चा रंगली आहे.मंगळवारी न्यूयॉर्कमध्ये एका पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी मस्क यांनी मेलोनी यांचे तोंडभरुन कौतुक केले. त्यांचा त्यांनी इमानदारी आणि सच्चाई असलेले व्यक्तिमत्व, असा उल्लेख केला.मेलोनी यांना ॲटलांटिक काऊन्सिल ग्लोबल सिटीझन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मस्क यांनी मेलोनी यांच्या सौंदर्याचेही कौतुक केले. त्या बाहेरुन जितक्या सुंदर आहेत त्यापेक्षाही त्या आतून सुंदर आहेत, असे मस्क म्हणाले.मस्क म्हणाले की, जॉर्जिया मेलोनी यांचे व्यक्तिमत्व हे कौतुक करण्यासारखे आहे. त्यांनी इटलीच्या पंतप्रधान म्हणून केलेले काम अविश्वसनीय आहे. त्या अस्सल, इमानदार आणि ख-या आहेत. प्रत्येक राजकीय नेत्याकडे हे गुण नसतात.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ हकालपट्टी करा

**मुंबई :** आगामी काळात होणा-या विधानसभा निवडणुका निष्पक्ष वातावरणात पार पडाव्या यासाठी वादग्रस्त पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहिले आहे.महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी कार्यरत असलेल्या रश्मी शुक्ला या अत्यंत वादग्रस्त अधिकारी आहेत. शुक्ला यांची सेवा जून 2024 रोजी समाप्त झाली आहे. मात्र असे असताना भारतीय जनता पक्ष आणि युती सरकारने त्यांना जानेवारी 2026 पर्यंत नियमबा रीत्या बढती दिली आहे. रश्मी शुक्ला यांची कार्यपद्धती अत्यंत वादग्रस्त राहिली असून नियमबा काम करणे तसेच विरोधी पक्षातील नेत्यांना धमकावण्याची कामे त्यांनी केली असल्याचा आरोप देखील नाना पटोले यांनी आपल्या पत्रात केला आहे.पत्रात पटोले यांनी म्हटले आहे की, रश्मी शुक्ला या 1988 च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी आहेत आणि सध्या त्यांच्याकडे पोलिस महासंचालक (डीजीपी) तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा (एसीबी) अतिरिक्त कार्यभार आहे. रश्मी शुक्ला यांची जन्मतारीख जून 1964 नुसार, त्यांची जून 2024 ही निवृत्तीची तारीख; परंतु महाराष्ट्र पोलिस कायद्याचे थेट उल्लंघन करून त्यांचा कार्यकाळ बेकायदेशीरपणे जानेवारी 2026 पर्यंत वाढवण्यात आला आहे. राज्याच्या डीजीपीचा कार्यकाळ दोन वर्षे किंवा निवृत्तीपर्यंत असतो.रश्मी शुक्ला यांची कार्यपद्धती वादग्रस्त असून त्यांनी बेकायदेशीर कामे केली असून विरोधी पक्षांच्या नेत्यांना धमक्या दिल्या आहेत. पटोले म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर 2024 मध्ये होणार आहे, अशा परिस्थितीत पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांना त्यांच्या पदावरून तात्काळ हटवावे जेणेकरून राज्यात निष्पक्ष निवडणुका व्हाव्यात.रश्मी शुक्ला या जून 1964 मध्ये जन्मलेल्या आणि 1988 च्या भारतीय पोलिस सेवेच्या (कढर) बॅचच्या अधिकारी आहेत. रश्मी शुक्ला यांची महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक (डीजीपी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मागील महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात शुक्ला यांना फोन टॅपिंग प्रकरणात आरोपी म्हणून नाव देण्यात आल्याने त्या वादात सापडल्या होत्या.काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडून आरोपांच्या फैरीरश्मी शुक्ला यांनी त्यांच्या कार्यकाळात विरोधी पक्षांच्या नेत्यांना त्रास देण्यासाठी आणि धमक्या देण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला आहे. अनेकदा खोट्या केसेस दाखल केल्या आहेत. रश्मी शुक्ला या भाजपसाठी राजकीय प्रचारक म्हणून काम करत आहेत. रश्मी शुक्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांचे फोन बेकायदेशीरपणे टॅप केले आहेत, त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. एसीबीच्या प्रभारी पोलिस महासंचालक या नात्याने त्यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना आणि सदस्यांना पोलिस स्टेशन आणि एसीबीच्या कार्यालयात बोलावून अधिकाराचा गैरवापर करून त्यांना जबरदस्ती धमकावले, राज्य गुप्तचर विभागात काम करतानाही त्यांनी पदाचा गैरवापर केला आहे.

## आमदार बच्चू कडूंचे आंदोलन सुरूच

### भर पावसात दिव्यांग बांधव मंत्रालयासमोर बसून



**मुंबई :** राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक आंदोलने सुरू आहेत. मराठा नेते मनोज जरांगे यांनी त्यांचे उपोषण मागे घेतले. मात्र आता दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी आमदार बच्चू कडू यांनी भर पावसात आंदोलन सुरू केले आहे. प्रहार अपंग संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आकाशवाणी आमदार निवास ताब्यात घेतले असून, जोपर्यंत सरकार तोडगा काढत नाही तोपर्यंत आंदोलन कायम राहणार असा इशारा, बच्चू कडू आणि प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सरकारला दिला आहे.

यावेळी बच्चू कडू म्हणाले, आमच्या 3-4 बैठका मुख्यमंत्री यांनी घेतल्या. घरकुल, पगारवाढ, दिव्यांग भवन, बोगस प्रमाणपत्रवर कारवाई आधी विषयांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठका झाल्या. मात्र, प्रशासन याकडे लक्ष देत नाही, असा आरोप बच्चू कडू यांनी केलाय.

एकीकडे लाडक्या बहिणीला सरकार पंधराशे रुपये देत आहे त्याचे स्वागत आहे. मात्र, दुसरीकडे दिव्यांगाचे अनेक प्रश्न आहेत. याकडे सरकारने लक्ष घालावे. जोपर्यंत दिव्यांगाचे प्रश्न सोडवले जात नाहीत, तोपर्यंत आंदोलन कायम राहणार आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

दिव्यांग कल्याण मंत्रालय प्रमुख प्रहार दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी एक वाजता आंदोलकांनी मंत्रालयासमोर पोहोचण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले होते. मात्र, आंदोलक आधीच या परिसरात दाखल झाले. त्यांनी थेट येथील आमदार निवासामध्ये घुसत त्याचा ताबा घेतला. नंतर हे आंदोलक टेरेसवर दाखल झाले आणि आंदोलन सुरु केले. या वेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली.